(७)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी. : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/1097/सभा–77/आ–4.

दिनांक : 23 डिसेंबर, 1997.

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 77व्या सभेचे इतिवृत्त..

मंगळवार दिनांक 9.12.1997 रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 77व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

जे.एस. साहनी

**सोबत** : 77व्या सभेचे इतिवृत्त.

**( जे.एस. साहनी )**
**सदस्य सचिव ( प्रशासन )**

21/12/97

प्रति,
अपर मुख्य सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य.

मा.मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष.

टपालात
स.स.(प्र.)
स.स.(तां)

आ-४

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

दिनांक 9.12.97 रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 77व्या सभेचे इतिवृत्त .

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 77वी सभा मंगळवार दिनांक 9.12.97 रोजी दुपारी 3.00 वाजता प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा माननीय मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनांत मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1) मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,
अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
तथा मंत्री, ग्राम विकास पाणी पुरवठा व
स्वच्छता विभाग, मंत्रालय,
मुंबई–32

2) श्री.रविंद्र माने,
उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
तथा राज्यमंत्री, नगर विकास
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई–32

3) मा.श्री.व्ही.रंगनाथन,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
तथा अपर मुख्य सचिव, पा.पु. व स्व. विभाग,
मंत्रालय, मुंबई–32

4) मा.श्री.नंदलाल,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
तथा सचिव–2, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई–32

5) मा.श्री.त्रिपाठी, उप सचिव,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
तथा प्रधान सचिव वित्त यांचे प्रतिनिधी,
मंत्रालय, मुंबई–32

6) मा.श्री.करंकळीकर,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
तथा सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई–32

7) मा.श्री.देवेंद्र फडणवीस,
महापौर, नागपूर महानगरपालिका,
तथा सदस्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

8) मा.श्री.सुरेश पटवर्धन,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
पुणे.

9) मा.श्री.माधव कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
पुणे.

10) श्री.आदिनाथ नवले पाटील,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
बलभीम चौक, ता. जि. बीड.

11) श्री.भानुदास पडळकर,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सांगली.

12) श्री.आशिष कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
वरळी, मुंबई–25.

13) श्री.राजीव सरदेशपांडे,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नागपूर.

14) श्री.जे.एस. साहनी,
सदस्य सचिव ( प्रशासन व बाहय अर्थसहाय्य),
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई–21.

15) श्री.राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव ( तांत्रिक ),
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई–21

प्राधिकरणाच्या सभेत उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांची रजा मंजूर करणेत आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते :–

1. श्री. नि.कृ. माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
2. श्री.भा.आ. डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

**कार्यक्रम बाब क्र.1 :** <u>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 76व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.</u>

76व्या सभेतील कार्यक्रम बाबीवरील इतिवृत्त सदस्य सचिव ( तांत्रिक ) यांनी वाचून दाखविल्यानंतर सर्व सदस्यांनी इतिवृत्तास मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र .2 :** <u>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 76 व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती.</u>

प्राधिकरणाच्या 76 व्या सभेच्या इतिवृत्तातील मंजूर कार्यक्रम बाबींवर करण्यांत आलेली कृती सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सभेपुढे वाचून दाखविली. सर्व सदस्यांनी केलेल्या कृतीवर होकार दर्शवून कार्यक्रम बाब मंजूर केली.

<u>गोपनीय.</u>

**कार्यक्रम बाब क्र.3 :–** <u>बृहत आराखडयात समाविष्ट केलेल्या ग्रामीण तथा नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी निधीची उभारणी – पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या नियोजनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कर्जरोखे व तत्सम माध्यमाद्वारे बाजारातून निधी उपलब्ध करण्यांस मान्यता देणे.</u>

बृहत आराखडयात समाविष्ठ असलेल्या ग्रामीण तथा नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक असणारा निधी व त्यासाठी करावयाच्या निधी उभारणीची माहिती प्राधिकरणाचे सदस्य सचिव (प्रशासन) व मुख्य अभियंता ( बाहय अर्थसहाय्य ) यांनी सविस्तरपणे सदस्यांचे निदर्शनास आणून दिली. तसेच या संदर्भात मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार नेमण्यात आलेल्या मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखालील शक्ती प्रदान समितीने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही होत असल्यांची व त्याप्रमाणे कर्जरोखे उभारुन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून तसेच सुमिटोमो बँकेकडून कर्ज उभारण्यात येणार असल्याचे विषद केले. तसेच हे कर्ज जरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उभारणार असले तरी महानगर /नगरपालिकांशी त्या त्या योजनेसाठी करार करुन कर्जफेडींची जबाबदारी स्थानिक संस्थावर टाकावी अशी सूचना सदस्य, श्री.सुरेश पटवर्धन यांनी केली. अशा प्रकारे साधकबाधक चर्चा होऊन पाणी पुरवठयाचा जिव्हाळयाचा प्रश्न विचारात घेऊन ही कार्यक्रम बाब मंजूर करुन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला की,

अ) शक्तीप्रदान समिती ठरवेल त्या अटी व शर्तीनुसार कर्जरोखे उभारुन, 1000 कोटी रुपयापर्यंत निधी उभारण्यांस, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्ज उभारण्यास, तसचे जेंव्हा केंव्हा सुमिटोमो बँकेकडून कर्ज घ्यावयाचे ठरेल, तेंव्हा शक्ती प्रदान समिती ठरवेल त्या अटी व शर्तीवर कर्ज घेण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

आ) असाही ठराव करण्यांत येतो की, कर्ज उभारणीच्या संदर्भात अरेंजर्स, इक्रा सिकॉम, आय.डी.बी.आय. यांना शक्तीप्रदान समिती ठरवेल, त्या दराने फीची रक्कम देण्यास व त्यानुषंगाने येणारा प्रासंगिक खर्च करण्यांस, व सुरुवातीस हा सर्व खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कोषागारातून करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

इ) वरील दोन ठरावाच्या अनुषंगाने या संदर्भात संबंधित वित्तीय संस्थाशी जे काही करार करावे लागतील. उदा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, आय.डी.बी.आय., हे विश्वस्त व कर्जरोख्यांची हमी घेणारे राज्य शासन, यांच्यात त्रिपक्षीय करार करणे व इतर पाऊले उचलण्यांस, उदा. रक्कमेचा भरणा करण्यासाठी कलेक्शन सेंटर उभारणे, निर्देशित बँकेमध्ये स्वतंत्र इस्क्रो खाते उघडणे किंवा हे रोख सुरक्षित असल्याने त्या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची मालमत्ता तारण ठेवणे, आणि इतर अनुषंगीक कारवाई करण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव ( प्रशासन व वित्त ) यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.4 :** <u>सन 1995—96च्या वार्षिक प्रशासकीय अहवालास मान्यता देणे.</u>

या कार्यक्रम बाबी अन्वये सादर करण्यांत आलेल्या सन 95—96च्या प्रशासकीय अहवालात अंतर्भूत असलेल्या व प्राधिकरणाला मिळणा—या ई.टी.पी. चार्जेसच्या अनुषंगाने सदस्यांनी असा मुद्या उपस्थित केला की, प्राधिकरणाला 1995—96 या वर्षात एकूण वसूली रु. 5664.69 लाख एवढी मिळाली असून खर्च मात्र रु.5934.38 लाख एवढा करण्यांत आला आहे. वरील प्रमाणे वसूली व खर्चाच्या आकडयावरुन असे दिसते की, मंडळाने वसूली पेक्षा खर्च अधिक केला आहे. यावर सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी असे स्पष्ट केले की, ही परिस्थिती मागील वर्षीही होती परंतु चालू वर्षात मोठया प्रमाणावर पाणी पुरवठा योजनांची कामे नव्याने निर्माण करण्यात येवून त्याची योग्य प्रगती साधणे चालू असल्यामुळे यापुढे खर्च मात्र मिळकतीपेक्षा अधिक असणार नाही. यावर सदस्यांनी असाही मुद्या उपस्थित केला की, प्राधिकरणाची मोठया प्रमाणावर रक्कम स्थानिक संस्थांकडून वसूल करावयाची आहे ही वसूली वेळीच करण्यात आली तर मात्र वसूली व खर्च यांची योग्य सांगड घालता येईल. काही स्थानिक संस्थांकडे मोठया प्रमाणावर असलेली थकबाकी त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे अजूनही थकीत आहे. ही वसूली काही अंशी माफ करण्यासाठी काही कार्यक्रम प्राधिकरणाने आखावा, काही प्रमाणात वसूलीच्या रक्कमा माफ केल्यास मोठया प्रमाणावर थकबाकी वसूल होईल, या सदस्यांच्या ।सुचनेवर मा. उपाध्यक्षांनी असे सुचीत केले की, अशा संस्थांनी पुढे येणे किंवा तशा प्रकारचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण थकबाकीची रक्कम माफ केली जाणार नाही. यासाठी शासन स्थरावर काही निर्णय घेण्यात यावा असे सचिव नगर विकास यांनी सूचविले.

जागतिक बँकेने पुर्ण करुन हस्तांतर केलेल्या योजनाची सद्यःस्थिती चांगली नसल्याचे निदर्शनास आणून सदस्यांनी असे सुचविले की, स्थानिक संस्थांच्या आर्थिक परिस्थितीमुळे योजना चांगल्या प्रकारे चालविण्यास ब—याच अडचणी निर्माण होत असतात, यास अनुसरुन मा.अध्यक्षांनी असे सूचविले की, योजना हस्तांतर करताना मोठया प्रमाणावर कामे अपूर्ण असतात, तर काही योजनांची योग्य चाचणी न होताच ती हस्तांतर करण्यात येतात. यामुळे योजना चालविताना संबंधीताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे याचा परिणाम योजनेवर होतो. यासाठी एक स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात यावी, जेणेकरुन अशा स्वरुपांच्या योजनांची वेळीच प्रगती साधणे सोयीचे होईल, तसेच योजना हस्तांतर करण्यापूर्वी अशा योजनांची द्विपक्षीय तपासणी करणे, योजना चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करणे इत्यादि महत्वाच्या बाबी पाहणे आवश्यक असल्याचाही मुद्या उपस्थित करुन या विषयावर सभेमध्ये एक तास स्वतंत्र चर्चा होणे आवश्यक असल्याचे मा. अध्यक्षांनी सुचविले.

सन 95—96च्या अहवालात पुर्ण किंवा कार्यान्वित करण्यात आलेल्या योजनांची यादीमध्ये डहाणू मनमाड व बार्शी कुर्डूवाडी वाढीव पाणी पुरवठा योजनांचा समावेश आहे त्याचप्रमाणे सन 1996—97 साली पूर्ण करावयाच्या योजनांमध्येही या तीनही वाढीव पाणी पुरवठा योजनेचा अंतर्भाव करण्यात आला आहे एकच योजना दोन्ही ठिकाणी दर्शविण्यात आली आहे त्यात सुधारणा करण्याचे सदस्यांनी सूचविल्यानुसार त्याप्रमाणे सुधारणा करण्याचे मान्य करण्यांत आले.

वरीलप्रमाणे चर्चा होऊन अहवाल नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सादर करण्याचे अधिकार सदस्य सचिव ( प्रशासन ) यांना देऊन कार्यक्रम बाब सर्वानुमते मंजूर करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र. 5 :** सन 1996–97 च्या वार्षिक लेख्यास मान्यता देणे.

ही कार्यक्रम बाब सविस्तरपणे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सभेपुढे वाचून दाखविली. यावर सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, वितरण व्यवस्थेचे परिक्षण व दुरुस्ती या लेखाशिर्षात सन 95–96 पेक्षा सन 96–97 मध्ये रु.1.20 कोटी इतकी वाढ झाली आहे. ही बाब स्पष्ट करण्यात यावी. रोख तडतोड विलंबन लेखा ( C.S.S. A/c ) या रक्कमा कमी करण्याबाबत प्रयत्न करण्याच्याही सुचना सदस्यांनी दिल्या. साठा / संग्रहातील रु. 14.93 कोटीचा साठा कमी करण्यांत यावा तसेच शिल्लक साठयाचा प्रथम वापर करण्यात यावा मोठया प्रमाणावर साहित्य इतरत्र वर्षोनुवर्षे पडून आहे या साहित्याची महाराष्ट्रातील इतर कार्यालयांना आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे तो कमी करुन त्याचा वापर करण्याच्या सूचनाही सदस्यांकडून आल्यानंतर यावर असे स्पष्ट करण्यात आले की, अशा प्रकारे अतिरिक्त असलेल्या साहित्याची यादी करण्यांत येवून ती महाराष्ट्रातील सर्व कार्यालयांना पाठविली जाते व त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे साहित्याचा वापर करण्यात येतो. तरीही सुचनेप्रमाणे अशाप्रकारे इतरत्र वापरात नसलेल्या साहित्याची एक स्वतंत्र यादी करुन ती सर्व कार्यालयास पाठवून त्यांचे आवश्यकतेप्रमाणे साहित्याचा वापर करण्यांत येईल.

जत पाणी पुरवठा योजनेवर रु.16 लक्ष तसेंच पंढरपूर पाणी पुरवठा योजनेवर सुध्दा मोठयाप्रमाणावर साहित्य साठा ब-याच वर्षापासून तसाच पडून आहे त्या साठयाचा इतरत्र कार्यालयात वापर होण्यासाठी तांतडीने उपाययोजना होण्यासंबंधी सदस्यांनी सुचविले. या सूचनेप्रमाणे या साहित्याची तपासणी करुन अनावश्यक साहित्य इतरत्र आवश्यकतेनुसार वापरात आणण्याचे ठरविण्यात आले.

वरील सर्व मुद्यांची माहिती पुढील सभेत सविस्तरपणे सदस्यांचे निदर्शनास आणून देण्यांत यावी, असे सूचवून ही कार्यक्रम बाब खालील प्रमाणे ठरावासह सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

1. ठराव करण्यांत येत आहे की, 1996–97 या वर्षाचे लेखे स्वीकृत करण्यांत यावेत.
2. असाही ठराव करण्यात येत आहे की, 1996–97 या वर्षाचे लेखे मंडळाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी अधिप्रमाणित करावेत.
3. तसेंच असाही ठराव करण्यात येत आहे की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये, ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी व सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने लेख्यांमध्ये करता येतील.
4. असाही ठराव करण्यांत येतो की,
   अ) रु. 764.11 लाख इतकी रक्कम घसारा निधीकडे विनियोजित करण्यात यावी.
   ब) रु.233.25 लाख इतकी रक्कम कर्ज निवारण निधीकडे विनियोजित करण्यात यावी.

**कार्यक्रम बाब क्र. 6 :** 1996–97 वित्तीय वर्षात खुल्या बाजारातील शासनाचे कर्ज उभारणी.

या कार्यक्रम बाबी अन्वये सन 1996–97 या वित्तीय वर्षात खुल्या बाजारातील शासनाने उभारावयाच्या कर्जासंबंधीची माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सर्व सदस्यांना दिली. नागरी पाणी पुरवठा योजनेसाठी कर्ज उभारण्याची आवश्यकता का आहे व या कर्ज उभारणीनंतर,कर्ज फेड कर्जावरील व्याज व कर्जाची मुदत इत्यादि बाबतही सविस्तर माहिती सभेस दिली. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शवून सदर कार्यक्रम बाब सर्वानुमते मंजूर करण्यात येवून असा ठराव पारित करण्यात आला की, ''प्राधिकरणाचे सदस्य सचिव ( प्रशासन) / वि.स.व मु.ले.अधिकारी यांना सन1997–98 मध्ये शासनाकडून उभारण्यांत आलेल्या खुल्या बाजारातील कर्ज रु. 118.35 कोटी .( रुपये एकशे अठरा कोटी पस्तीस लक्ष फक्त ) शासनाचे अटी व शर्तीस अधीन राहून शासनाकडून प्राप्त करुन घेण्यात मान्यता देण्यात येत आहे''.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. 1 :–**

**विषय :** कन्हान पाणी पुरवठा केंद्र सुधार योजना..
कन्हान नदीच्या पात्रांतील अंतरग्राही विहिर कनेक्टींग डक्ट, जॅकवेल व पाईपलाईन ओलांडण्यासाठी कन्हान नदीवरील पूल इत्यादि कामाची निविदा ...

आयत्या वेळेची कार्यक्रम बाब म्हणून कन्हान पाणी पुरवठा केंद्र सुधार योजनेसंबंधीची वरील कामांची कार्यक्रम बाब सभेपुढे ठेवण्यात यावी अशी विनंती प्राधिकरणाचे एक सदस्य श्री.फडणवीस यांनी केली. श्री.फडणवीस, महापौर, नागपूर तथा सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , यांनी या प्रस्तावासंबंधी सदस्यांच्या असेही निदर्शनास आणून दिले की, नागपूर रहिवाश्यांच्या अत्यंत जिव्हाळयाचा हा प्रश्न असून हा प्रश्न अनेक वर्षापासून रेंगाळलेला आहे. तेंव्हा या प्रस्तावास सभेने मान्यता द्यावी. त्यावर सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, या कामासाठी स्विकारावयाच्या निविदेचे दर इत्यादि बाबत सदस्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

यावर सदस्य सचिव ( तांत्रिक) यांनी या कामांची रु.7,78,79,500/– अंदाजित खर्चाची निविदा वर्तमानपत्रांत व्यापक प्रसिध्दी देवून बोलविण्यांत आल्या होत्या असे सांगितले. सदर निविदा सूचनेनुसार एकूण 18 ठेकेदारांना या कामासाठी पूर्वअर्हता प्रमाणपत्र देण्यांत आले होते. त्यापैकी 17 ठेकेदारांनी निविदापत्रे विकत घेतली. निविदा स्वीकृतीच्या दिवशी एकूण 8 ठेकेदारांनी त्यांच्या निविदा सादर केल्या. मे.अेस.के.बॅनर्जी, नागपूर यांचा देकार 8.67 टक्के कमी दराचा असल्याचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सभेस सांगितले. मे.अेस.के. बॅनर्जी, नागपूर या कंपनीने या प्रकारची कामे केलेली असून त्यांचा देकार स्वीकारार्ह आहे असे सदस्य सचिवांनी सांगितले.

सदर काम एकूण 24 महिन्यांत पूर्ण करावयाचे असून नियमानुसार ठेकेदारास कार्य कालावधीत भाववाढ ( Price variation ) देय राहील असाही खुलासा करण्यात आल्यानंतर सदर कार्यक्रम बाब मंजूर करण्यात आली.